**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५७/२०२३**

(उमेश वि. माणिक व इतर)

**CNR No.MHSO07-000519-2023**

## निशाणी क्र.२२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाले क्र.२ यांनी म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सामनेवाल्याच्या कथनानुसार, त्यांना याकामी आवश्यक कागदपत्रे मुदतीत न मिळाल्यामुळे त्यांना वेळेत म्हणणे दाखल करता आले नाही. त्यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर वाद हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने सामनेवाल्यांचे देखील हक्क व हितसंबंध गुंतलेले आहेत. सबब, त्यांना म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे स्वीकारण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. अर्जदाराने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदार व सामनेवाले तर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाचे स्वरुप पाहता, सामनेवाल्यांचे देखील हक्क हितसंबंध अर्जात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना देखील त्यांचे म्हणणे दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत सामनेवाल्यांच्या विनंतीनुसार त्यांना म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास अर्जदारावर कुठलाही

अन्याय होत नाही. उलटपक्षी प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. सबब, खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये ५००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सामनेवाले क्र.२ यांनी खर्चाची रक्कम अर्जदारास पुढील तारखेपर्यंत द्यावी. |
| ३. | सामनेवाले क्र.२ यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे. |

PRAVIN PUNDLIK BAGUL

Digitally signed by PRAVIN PUNDLIK BAGUL
Date: 2025.01.09 16:53:20 +0530

(पी. पी. बागुल)

दिनांकः– ०९.०१.२०२५

४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर

<u>**Certificate**</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 09.01.2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 09.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | - | 09.01.2025 |